# दुधाळ जनावरे खरेदी करत असताना शेतकऱ्यांनी घ्यावयाची काळजी

दुग्धव्यवसाय फायदेशीर राहण्यासाठी चांगल्या दुधाळ जनावरांची खरेदी करण्याची नितांत गरज असते. दुधाळ जनावरे निवड करताना त्या जनावरांची वंशावळ नोंद (दाखला ) तपासावे. वंशावळ नोंद उपलब्ध नसेल तर जनावरांची शारीरिक ठेवण विचारात घ्यावे तसेच कमीत कमी तीन वेळेस दूध काढताना प्रत्यक्ष उपस्थित राहून जनावरे निरीक्षण करावे व दुधाच्या सरासरीवरून चांगल्या दुधाळ जनावरांची खरेदी करावी.

१. जनावरांची ठेवण ही त्रिकोणाकार असली पाहिजे म्हणजे समोरचा भाग निमुळता व पाठीमागील भाग मोठा व रुंद असला पाहिजे.
२. पहिल्या किंवा दुसऱ्या वितातिल जनावरे खरेदी कराव्यात ( पहिल्या पाच वितात जनावरे जास्त दूध देतात).
३. जनावरे विल्याच्या एका महिन्यात खरेदी करावीत.शक्यतो मादी वासरू असलेले जनावरे विकत घ्यावीत.
४. जनावरांचे डोळे चमकदार असावेत. मान बारीक , कातडी मऊ व पातळ असली पाहिजे.
५. स्वभाव शांत (लाथ न मारणारी) असावी.
६. लवकर पान्हा सोडणारी , कोणत्याही व्यक्तिला दूध काढू देणारी व वासराविना दूध देणारी असावी.
७. कासेच्या शिरा मोठ्या , लांब व स्पष्ट असाव्यात . कासेची चारही कप्पे पूर्ण विकसित असाव्यात.दूध काढणे झाल्यावर कास पुर्णपणे आकुंचन पावावे.
८. चारही सडे एकाच आकाराची असून त्यांची लांबी सारखी असावी . दुधाच्या धारा पुर्णपणे सरळ व सहजरित्या दाब दिल्यानंतर निघाव्यात. दूध काढतांना काढण्याऱ्या व्यक्तिला तसेच जनावराला कसलाही त्रास होवू नये.






प्रकाशक : **डॉ. एकनाथ भा. चाकूरकर,** निर्देशक, भाकृअनुप. - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र

संपादक : **श्री एच. आर. सी. प्रभु,** कार्यक्रम समन्वयक

लेखन : **डॉ. संजयकुमार वि. उद्धरवार,** विषयतज्ञ (पशु विज्ञान), **डॉ. एकनाथ भा. चाकूरकर,** मुख्य शास्त्रज्ञ (पशू विज्ञान)

तकनीकी सहहायक : **श्री विश्वजीत प्रजापती,** कार्यक्रम सहहायक (कॅम्पूटर)



## कृषि विज्ञान केंद्र

भाकृअनुप - केंद्रीय किनारी कृषि संशोधन केंद्र

जुने गोवें, गोवा - 403 402 फोन : 0832-2285475ई-मेल : pckvknorthgoa@gmail.com वैबसाइट : www.kvkicarrcgoa.in